
वृत्तपत्राचे नांव - लोकमत
दिनांक - 23/9/2016





सोलापूर विद्यापीठात झालेल्या मानवी हक्क कार्यशाळेत अशा पद्धतीने विद्यार्थी व प्राध्यापकांनी हजेरी लावली होती. दुसऱ्या छायाचित्रात या कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्रा. ई. एन. अशोककुमार शेजारी आयोगाचे सदस्य एम. ए. सईद, राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष एम. आर. बन्नूरमठ, कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार, एम. ए. सईद, भगवंतराव मोरे, डॉ. माया पाटील.

# विश्वबंधुत्वाचा विचार जोपासा : बन्नूरमठ

## सोलापूर विद्यापीठ : 'मानवी हक्क' कार्यशाळेचे उद्घाटन

सोलापूर : जागतिकीकरणाच्या युगात माणूस अधिकाधिक संकुचित व स्वकेंद्रित विचार करीत आहे. मानवतेवरील आपला विश्वास दृढ करुन विश्वबंधुत्वाचा विचार जोपासत इतरांच्याही मानवी हक्कांची जपणूक आपण केली पाहिजे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती एम. आर. बन्नूरमठ यांनी केले.

सोलापूर विद्यापीठातील सामासिक शास्त्र संकुलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय 'ह्युमन राईट्स अॅण्ड ह्युमनायजिंग सोसायटीज' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बन्नूरमठ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कुलगुरु डॉ. एन. एनं. मालदार, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम. ए. सईद, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य भगवंतराव मोरे, कुलसचिव डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा, सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. ई. एन. अशोककुमार, चर्चासत्राचे समन्वयक डॉ. माया पाटील, डॉ. प्रकाश व्हनकडे आदी उपस्थित होते.

२०१३ पासून राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना झाली असे सांगून न्यायमूर्ती बन्नूरमठ म्हणाले की, अनेकांना न्याय मिळवून देता आला याचे आम्हाला समाधान आहे. सार्वजनिक प्राधिकरणात कार्य करणाऱ्या व्यक्ती मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारींबाबत योग्य कारवाई करीत नसतील तर अशा व्यक्ती व प्राधिकरणावर कारवाई करून सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम आम्ही करतो. आयोगाकडे आलेली प्रकरणे निकाली काढताना आम्ही अर्जदारांकडून कोणतेही शुल्क आकारत नाही. मानवी हक्कांचे उल्लंघन कोठे होत असेल तर कोणीही या संदर्भात आयोगाकडे याची माहिती देऊ शकतो. गरज पडल्यास आयोग स्वत: होऊन काही प्रकरणात कारवाई करु शकतो.

अध्यक्षीय भाषणात बोलताना कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार म्हणाले की, आपण हक्कांबाबत जेवढे जागरूक असतो तेवढाच इतरांच्या मानवी हक्कांचा विचार करून त्यानुसार आपल्या वागणुकीत बदल केले पाहिजेत. प्रास्ताविक संकुलाचे संचालक प्रा. ई. एन. अशोककुमार यांनी केले. चर्चासत्राची भूमिका डॉ. माया पाटील यांनी व्यक्त केली. आभार डॉ. प्रकाश व्हनकडे यांनी मानले. (प्रतिनिधी)

### कोण काय म्हणाले...

- मानवी हक्क हे प्रत्येकाला जन्मत:च प्राप्त होणारे आहेत. हे कोणालाही हिरावून घेता येणार नाहीत, असे हक्क आहेत. शिक्षण हे मानवी हक्कांची जाणीव करून देणारे महत्त्वाचे साधन आहे. मानवी हक्कांबाबत अलीकडच्या काळात चांगले कार्य झाले आहे. मानवी हक्कांबाबत आणखी महत्त्वपूर्ण कार्य होण्यासाठी लोकांनी खुल्या मनाने विचार करण्याची तसेच मानवी हक्कांची जपणूक करण्याची गरज आहे, असे मत महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम. ए. सईद यांनी व्यक्त केले.
- विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ज्ञान प्राप्त करावे, राज्य मानवी हक्क आयोग प्रसंगी तपास करूनही कारवाई करतो. काही जण खोटे दस्तावेज तयार करून मानवी हक्काच्या क्षेत्रात कार्य करतो, असे भासवून गैरवापर करतात. त्यांच्यावर कारवाई करणार असल्याचे मत यावेळी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य भगवंतराव मोरे यांनी व्यक्त केले.

### मान्यवरांची उपस्थिती....

- दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनास हैदराबाद केंद्रीय विद्यापीठातील प्रा. शिव प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दिन, म्हैसूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. मुजफ्फर असादी, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके या चर्चासत्रातील वक्त्यांसह बी.सी.यु.डी. संचालक प्राचार्य आर. वाय. पाटील, विविध संकुलाचे संचालक, अध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आज होणारे व्याख्यान**

- कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात मुजफ्फर असादी यांचे व्याख्यान दि. २३ सप्टेंबर रोजी हैदराबादच्या केंद्रीय विद्यापीठातील प्रा. शिव प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दिन, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके आदींची व्याख्याने होणार आहेत.